PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Dhagedore
Year: 2012

Song: Mana Aatale Samjun Umjun
Lyricist: Sandeep Khare

मना आतले समजून उमजून
जे गाते ते गाणे
प्राणामधले श्रावण वेचून
जे गाते ते गाणे
मना आतले समजून उमजून
जे गाते ते गाणे
ओ प्राणामधले श्रावण वेचून
जे गाते ते गाणे
समजून गाते ते गाणे
उमजून गाते ते गाणे
श्रावण वेचून जे गाते ते गाणे

चराचरातून वसते गाणे
निरवताही गाते गाणे
चराचरातून वसते गाणे
निरवताही गाते गाणे
कल्लोळाच्या नशेत भिजली
गजबज म्हणजे नसते गाणे
नसते गाणे नसते गाणे
मौनामधले अर्थ थरारून
जे गाते ते गाणे

ओ प्राणामधले श्रावण वेचून
जे गाते ते गाणे
समजून गाते ते गाणे
उमजून गाते ते गाणे
श्रावण वेचून जे गाते ते गाणे

गगन बोलते जे धरणीशी
नजर बोलते जे नजरेशी
गगन बोलते जे धरणीशी
नजर बोलते जे नजरेशी
तेच काहीसे बोलू बघते
माझे गाणे तव ओठाशी
तव ओठाशी तव ओठाशी
रंग तरारून देह थरारून
जे गाते ते गाणे
प्राणामधले श्रावण वेचून
जे गाते ते गाणे
समजून गाते ते गाणे
उमजून गाते ते गाणे
श्रावण वेचून जे गाते ते गाणे

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*